# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक २४/०६/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | अग्निशमन विभागातील कर्मचारी यांचा ग्रुप विमा नुतनीकरण करणेबाबत प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका अग्निशमन विभागातील एकूण २३१ कर्मचारी वर्ग यांचा ग्रुप विमा पॉलिसी नुतनीकरण बाबत दि. २५/०४/२०१६ रोजीचे दि. न्यू. इंडिया इन्शरन्स कंपनी लि. यांचे पत्रानुसार ग्रुप विमा पॉलिसी विम्याची रक्कम रु. ५,००,०००/- (अक्षरी पाच लाख रु. मात्र) भरण्याकरीता एवढ्या खर्चास कार्योत्तर प्रशासकीय व वित्तीय कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम.कांता पाटील सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| २ | विरार पूर्व प्रभाग समिती सी मध्ये सर्व्हे नं. १६ येथील बहुउद्देशिय इमारती मधील दुसऱ्या मजल्याच्या फर्निचरचे काम करणे याकामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** सदर कामी होणाऱ्या अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४०,९२,४६५/- या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे व सदर कामी ई-निविदा प्रक्रियेद्वारे निविदा दर मागविण्यांत यावेत असे ही सभा ठरविते.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| ३ | वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नालासोपारा (प.) प्रभाग क्र. ६० मध्ये चंद्रेश गौरव अपा. जवळ गटार बांधणे कामास प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** वरीलप्रमाणे प्रस्तावाबाबत सभागृहात सविस्तर चर्चा होवून उपरोक्त नमुद कामास प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देण्यांत येत आहे व तसेच पुढील आवश्यक निविदा कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. मिलिंद घरत सूचक :- मा.श्री. अब्दुल हक पटेल** |
| ४ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या प्रकरण ९ व कलम ९२ (२) मधील तरतुदीनुसार मुदतठेवी गुंतवणूक निर्गत करणे कामी मा. स्थायी समिती सभेपुढे सादर करणे. | **ठराव :-** प्रस्तावित केल्यानुसार महानगरपालिके कडील प्राथमिक सोयीसुविधा अंतर्गत प्राप्त झालेला निधी रुपये १७,३४,०२,८८७/- मुदत ठेवी मध्ये गुंतवणूक केलेली असून सदर ठेवी मुदती आधी निर्गत करुन प्राथमिक सोयीसुविधाचे बचत खाती आवश्यकतेनुसार वर्ग करणेकामी कार्यवाही करणेस आजची स्थायी समिती मा. आयुक्त यांना अधिकार प्रदान करीत असुन शिल्लक रक्कम पुर्न:गुंतवणूक करण्यास देखिल याव्दारे मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स सूचक :- मा.श्री. सुनील आचोळकर** |
| ५ | स्वच्छ भारत अभियान अंतर्गत पर्यावरणाचा समतोल राखण्याकरीता प्लास्टिक विरोधी जनजागृती करण्याकरीता | **ठराव :-** प्लास्टिक पिशवीचा वापर न करता कापडी पिशवीचा वापर करणे, केर कचरा कुंडीत टाकणे, सार्वजनिक ठिकाणी उघड्यावर मलमुत्राची विसर्जन न करणे, सार्वजनिक ठिकाणी पान, गुटखा, तंबाखुजन्य पदार्थांचे सेवन करुन न थुंकणे, महापालिके हद्दीमध्ये वृक्षतोड करु नये अथवा करणेत प्रवृत्त करु नये या अनुषंगाने स्वच्छ सुंदर हरित वसई विरार ही संकल्पना राबविणेबाबत महानगरपालिका हद्दी नागरीकांमध्ये जनजागृती करणे कामी विविध ठिकाणी पथनाट्य कार्यक्रम आयोजन करणे व या कार्यक्रमा |

| | | |
|---|---|---|
| | महानगरपालिका हद्दित विविध ठिकाणी पथनाट्य आयोजित करणेबाबत. | करीता बॅनर्स, वाहने, फोटोग्राफी व्हिडीओ शुटींग, साऊंड सिस्टीम इ. कामा अंदाजे येणाऱ्या रू. ३,००,०००/- इतक्या खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्रीम. कांता पाटील सूचक :- मा.श्रीम.छाया पाटील** |
| ६ | प्रभाग समिती ड (नविन प्रभाग एच) वॉर्ड नं. ६२ (नविन वॉर्ड नं ७५) मधील सातीवली दफनभुमी मध्ये माती भराव करणेकामी मंजुर निविदाधारकांबरोबर संविदा करणेस मान्यता देणेबाबत. | **ठराव :-** उपरोक्त निविदाची तुलना करता कमीत कमी दराची मे. शार्प एंटरप्रायजेस यांची १.००% कमी दराची निविदा प्राप्त झ् ाालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजूरीची शिफारस केली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) नुसार मे.शार्प एंटरप्रायजेस<br>यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. मिलिंद घरत सूचक :- मा.श्री. अब्दुल हक पटेल** |
| ७ | वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती अे अंतर्गत येणाऱ्या बोळींज विभाग येथील दैनंदिन बाजारकर लिलावाची जादा दराची ई-निविदा मंजुर करणे बाबत. | **ठराव :-** वसई-विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती अे अंतर्गत येणाऱ्या बोळींज विभाग येथील दैनंदिन बाजार वसुलीकामी प्राप्त झालेल्या वरील निविदेपैकी अ.क्र. २ श्रीम. शालीनी एम.राऊत यांची रक्कम रू.८,८१,०००/- (अक्षरी आठ लाख एक्क्याऐंशी हजार रू.मात्र) या निविदेची रक्कम सर्वात जास्त आहे. तसेच १४.५०% सेवाकर पकडून रू.१०,०८,७४५/- (अक्षरी दहा लाख आठ हजार सातशे पंचेचाळीस रू. मात्र) एवढ्या जास्त रक्कमेची ई-निविदा मंजूर करणेंस ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. सुनील आचोळकर सूचक :- मा.श्री.प्रशांत राऊत** |
| ८ | सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षाकरीता विभागीय कार्यालय विरार पूर्व येथील आठवडे बाजार आणि दैनंदिन बाजार फी वसुलीसाठी प्राप्त झालेल्या निविदा दराबाबत. | **ठराव :-** सदर बाबत सभागृहात चर्चा होऊन विरार पूर्व तत्कालीन नगरपरिषद क्षेत्र येथील बाजार शुल्क वसुलीसाठी मे. रेचल टेंडीग्ज यांची जास्त दराची रक्कम रू. ५८,५९,९३०/- इतकी निविदा मंजूर करणेंस सर्वानुमते मान्यता देणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री.प्रशांक राऊत सूचक :- मा.श्री. पंकज ठाकूर** |